स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्रमांक
०२०२५६२२६८०
०२०२५६२२६८८
०२०२५६२२६८९
०२०२५६२२६९०
०२०२५६२२६९१

फॅक्स क्रमांक २५६०११५४

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११००७

संदर्भ क्र. विविमं/२०२२–२३/२९२ दिनांक : ०५/०१/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
**पुणे शहरातील महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**
**विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.**

**विषय : G-20 परिषद जनजागृती रॅली बाबत.....**
**संदर्भ : जा.क्र. उभुसं/११/जी–२०/१४७९/२०२२ दिनांक ३१ डिसेंबर २०२२ चे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, जी–२० परिषदेचे आयोजन भारत, इटली इंडोनेशिया या ३ देशात दि. १ डिसेंबर २०२२ ते पुढील १ वर्ष कालावधीमध्ये करण्यात आलेले आहे. सदर परिषदेमध्ये जगभरातील ४० देशांचे शिष्टमंडळ व मान्यवर बैठक व चर्चासत्रांमध्ये सहभागी होणार असून त्याअनुषंगाने मान्यवरांना स्थानिक संस्कृती वारसा दाखविण्याचे प्रस्तावित आहे.

भारतात जी–२० या विविध देशांतील प्रतिनिधिंच्या उपस्थितीत पार पाडणाऱ्या परिषदेतील कार्यक्रमासाठी अन्य स्थळांसह सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे स्थळ देखील निश्चित करण्यात आले आहे. १६ जानेवारी रोजी या परिषदेतील एक कार्यक्रम विद्यापीठाच्या प्रांगणात होणार आहे. जी–२० ही परिषद काय आहे, कशासाठी आहे याबाबत माहिती देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विशेष माहितीपर व्याख्यानाचे आयोजन होणार आहे.

एक महत्वाचा टप्पा म्हणजे जी–२० परिषद ही नेमकी काय आहे, यात कोण सहभागी होणार आहे, या परिषदेच्या माध्यमातून काय साध्य होणार आहे, याचा इतिहास काय सांगतो अशा सर्व प्रश्नांची उत्तरे ही परिषद सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना तसेच सामान्यांना मिळणार आहे. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने जी–२० शिखर परिषदेची जनजागृती करण्याकरिता दि. १२ जानेवारी, २०२३ रोजी रॅलीचे खालीलप्रमाणे आयोजन सकाळी ८.०० ते १०.०० या वेळेत करण्यात येणार आहे.

**रॅली मार्ग :– (सुरवात सकाळी ८.०० वा.) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय शिवाजीनगर, पुणे – शनिवारवाडा मागे – लाल महाल** (थांबा) **– एच. व्ही. देसाई महाविद्यालय – लेले दवाखाना – शनिवारवाडा मुख्य प्रवेश द्वारा शेजारुन – पुणे महानगरपालिका पुल (मंगला थिएटर समोरुन) – सिमला ऑफिस – राहूल थिएटर समोरिल पुलावरुन – गणेशखिंड मार्गे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुख्य प्रवेशद्वारातून – वनस्पतीशास्त्र विभागासमोरुन – मुख्य इमारतीमागे (रसायनशास्त्र विभागासमोरुन) – स्वामी विवेकानंद पुतळा** (थांबा) **– मा. कुलगुरु निवासस्थाना समोरुन मुलींच्या वसतिगृहा समोरुन – सेवक विहार येथे (समारोप सकाळी १०.०० वा.)**

सदर रॅलीमध्ये आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना यातील विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल. सहभागी विद्यार्थ्यांना जी–२० च्या निमित्ताने एक टी–शर्ट, व कॅप भेट देण्यात येणार असून या रॅलीतील सहभागांबाबत महाविद्यालय/परिसंस्थांनी खालील गुगल लिंकद्वारे https://forms.gle/4uop76PtdNYsdCv1A सोमवार दि. ९ जानेवारी २०२३ रोजी दुपारी ४.०० वा. पर्यंत नावनोंदणी करण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. व सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांची माहिती भरुन गुगल फॉर्ममध्ये अपलोड करावी. **नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना दि. १२ जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ८.०० वा. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मैदान शिवाजीनगर, पुणे** या ठिकाणी सोबत जोडलेल्या हमीपत्रासह उपस्थित रहाण्यास कळवावे. कळावे ही विनंती.

.

संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

## महाविद्यालयाचे लेटर हेड

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | लिंग | मोबाईल क्र. | वाहन प्रकार | वाहन क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |

मा.प्राचार्य
स्वाक्षरी / शिक्का

# हमीपत्र

प्रति,

मा. प्राचार्य,

...........................................

...........................................

मी ........................................................,.............................................महाविद्यालय पुणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने G-20 परिषदेविषयी जनजागृतीबाबत आयोजित रॅलीमध्ये दि. १२ जानेवारी, २०२३ रोजी माझ्या स्वत:च्या जबाबदारीवर सहभागी होत असून मी संपूर्ण नियमांचे पालन करीन अशी हमी देतो. माझ्याकडून कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य यादरम्यान घडणार नाही. माझ्याकडून कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहील याची मला पूर्ण कल्पना आहे.

सही :

नाव : .............................................................

मो. क्र : ..........................................................

महाविद्यालयाचे नाव : ...............................................

महाराष्ट्र शासन

# उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) क्र.११,पुणे यांचे कार्यालय
## बी-विंग, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे-४११ ००१

E-mail:-puneslao11@gmail.com

जा.क्र.उभुसं/११/जी-२०/कावि/१४७९/२०२२ दिनांक:-३१/१२/२०२२

**प्रति,**

मा. निबंधक, तथा नोडल अधिकारी, G-२० परिषद
सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ.

**विषय:**- G- २० परिषद आयोजनाचे अनुषंगाने पुणे विद्यापीठात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत.

**संदर्भ :**-१. जे.डब्ल्यु. मॅरियेट हॉटेल येथील केंद्र सरकारच्या G-२० समितीची मिटिंग दि.२७/१२/२०२२ व समितीची स्थळपाहणी दि.२७/१२/२०२२
२. केंद्र सरकार आर्थिक कार्य विभागाकडील पत्र दि.२९/१२/२०२२
३. मा.विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथील दि.३०/१२/२०२२ रोजीच्या व्हिडिओ कॉन्फरन्स मध्ये दिलेल्या समक्ष सूचना

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, जी- २० परिषदेचे आयोजन भारत, इटली व इंडोनेशिया या ३ देशात दि. ०१/१२/२०२२ ते पुढील १ वर्ष या कालावधीमध्ये करण्यात आलेले आहे. या महत्वाकांक्षी कार्यक्रमांचे यशस्वीरित्या नियोजन व आयोजन करण्याची जबाबदारी केंद्र शासनाच्या बरोबरोच राज्य शासनावरही असून या कालावधीमध्ये जगभरातील जवळपास ४० देशांचे शिष्टमंडळ व अनेक देशातील मान्यवर बैठक व चर्चासत्रामध्ये सहभागी होणार असून त्याअनुषंगाने सदर मान्यवरांना स्थानिक संस्कृती वारसा दाखविण्याबाबतचे प्रस्तावित आहे. जी- २० अंतर्गत होणाऱ्या परिषदा / बैठका या मुंबई, पुणे व औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

तथापि, जी-२० बैठकीच्या संदर्भाने G-२० ची पार्श्वभूमी, इतिहास, कार्यक्षेत्र याबाबत विदयार्थी व इतर जनसामान्यांमध्ये जनजागृती (Awareness) होण्याकरिता सदर परिषदेपूर्वी म्हणजेच दि.१३ व १४ जानेवारी, २०२३ दरम्यान आपले विद्यापीठातीत एका व्याख्यानाचे आयोजन करण्यात यावे. या व्याख्यानाची आपले अधिनस्त सर्व महाविद्यालयांमध्ये विस्तृत प्रमाणात प्रसिध्दी करुन सर्व विदयार्थी सदर व्याख्यानाचा Online / offline लाभ घेऊ शकतील अशी व्यवस्था

आपले स्तरावरुन करण्यात यावी, तसेच संदर्भ क्र.३ नुसार व्हिडिओ कॉन्फरन्स मधे दिलेल्या समक्ष सूचने नुसार दि.८जानेवारी ते दि.१५ जानेवारी २०२३ दरम्यानच्या कालावधीतही G-२० जनजागृती (Awareness) बावत कार्यक्रमांचे / व्याख्यानांचे आयोजन करणेत यावे. तसेच आपण केलेल्या नियोजनाची कार्यक्रम रुपरेषा इकडे देण्यात यावी.

**अप्पर जिल्हाधिकारी, तथा**
**समन्वय अधिकारी G-२० परिषद, पुणे**

प्रत:- मा.कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडे माहितीकरिता सविनय सादर.